# मराठी विनोदी कथेचा प्रवाह

**अर्चना देवेंद्र कुलकर्णी**
संशोधक विद्यार्थीनी
**डॉ.अरुणा दुभाषी**
संशोधक मार्गदर्शक
एस.एन.डी. टी. महिला विद्यापीठ,चर्चगेट

---

अभ्यास कोणत्याही साहित्य प्रकाराचा असला तरी त्या साहित्य प्रकाराची परंपरा वा इतिहास पाहणे आवश्यक असते. वर्तमानातले त्या साहित्य प्रकाराचे रूप हे त्या सुरवातीच्या रुपाहूनन भिन्न असते.कारण कालौघात त्यात अनेक बदल झालेले आढळून येतात. वातावरण, विचार, व्यक्ती , पिढ्या अश्या विविध कारणांमुळे हे बदल घडून येतात. प्रस्तुत लेखात 'मराठी विनोदी कथेचा प्रवाह ' याविषयीचे विवेचन ह्याच उद्देशाने केले आहे.

विनोदाची परंपरा संस्कृत वाङ्म्या पासून आढळते.संस्कृत नाटकात ' विनोद करणारा ' म्हणून विदूषक हे पात्र येत होते. तो अतिशय खादाड , टिवल्या-बावल्या करणारा , मुर्खतेने वागणारा ,गबाळा वेश असलेला असा दिसत असला तरी राजाचे रंजन करणारा आणि राजाला मार्गदर्शन करणारा असा होता.अंगविक्षेप करणे, थट्टामस्करी करणे , खोड्या काढणे , वेडे चाळे करणे अश्या अनेक क्लृप्त्या योजून हास्यनिर्मिती करणे हेच त्याचे प्रमुख काम होते.विदूषकाचे रूपांतर कालांतराने विनोदी पात्रात झालेले दिसते.

मराठी कथेतील विनोदाचा विचार करतांना महानुभाव पंथातील लीळाचरित्रातील 'साधेचे लाडू ' यांसारख्या कथा लक्षात घेता येतात.वारकरी संत परंपरेतील एकनाथांनी भारुडामधून तर तुकारामांनी काही अभंगातून विनोदाद्वारे समाजप्रबोधन केलेले दिसून येते.आधुनिक मराठी कथेची सुरवात एको णीसाव्या शतकात झालेली दिसते.इ.स.१८१८मध्ये इंग्रजी शिक्षण पध्दतीची

मुहूर्तमेढ रोवली गेली. देशी भाषांना उत्तेजन देण्याच्या इंग्रजांच्या धोरणामुळे मराठी भाषेला महत्व प्राप्त झाले. साहजिकच या काळात नीतिकथा, दंतकथा,चातुर्यकथा, चुटके इत्यादी विविध प्रकारचे लेखन होऊ लागले. याच काळात आधुनिक मराठी कथेचा आणि विनोदी कथेचा उदय झाला.

१९१५ च्या सुमारास हरिभाऊ आपटे यांनी निव्वळ विनोदी म्हणता येईल अशी 'डिप्सेप्शिया ' , 'खाशी तोड' अश्या कथांची निर्मिती केली.

मानवी स्वभावाचे विविध कंगोरे व्यक्त करणाऱ्या, गैरसमजातून निर्माण होणारे प्रसंग असलेल्या कथा हरिभाऊंनी लिहिल्या. त्या कथेमध्ये कलाटणी तंत्राचा वापर करून हरिभाऊंनी हास्यनिर्मिती केली. या कथा ' स्फुट गोष्टी ' म्हणून ओळखल्या जात.

हरिभाऊनंतर वि.सी.गुर्जर यांनीही विनोद प्रधान कथा लिहिली.

१९०२ मध्ये श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी 'साक्षीदार ' हा पहिला विनोदी लेख लिहिला होता. त्यांनीच पुढे समाजातील अनिष्ट रुढींवर ताशेरे ओढण्याच्या हेतूने उपहासप्रधान कथा लिहिल्या.त्यासाठी त्यांनी 'बंडूनाना', '.सुदामा ' व 'पांडुतात्या ' ही काल्पनिक पात्रे निर्माण केली. कोल्हटकरांनी सनातन पध्दतीचा अतिरेक, साहित्याबद्दलची अरुची,कौटुंबिक धाकदपटशाही इत्यादी विषयाला तोंड फोडण्यासाठी औपरोधिक टिका केली. कथेच्या माध्यमातून प्रेरणा देण्यास कोल्हटकरांनी सुरुवात केली, तेही मनोरंजक पद्धतीने.

कोल्हटकरांनंतर रा.ग.गडकरी यांनी कोल्हटकरांचा विनोदाचा वारसा पुढे चालविला. ते कोल्हटकरांना गुरू मानत.गडकऱ्यानी विनोदी लेखनाला १९१३ मध्ये सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी 'बाळकराम' हे टोपणनाव धारण केले.

पूर्वीच्या काळी मुलगी झाली की तिच्या विवाहाची चिंता तिच्या पित्याला सतावत असे. याचे कारण म्हणजे हुंडा, मानपान वगैरे. या सगळ्या अपप्रवृत्तीवर आपल्या धारदार लेखणीने पण अतिशयोक्तीपूर्ण विनोदाचा आधार घेत गडकऱ्यांनी लेखन केले. त्यासाठी त्यांनी सुद्धा कोल्हटकरांप्रमाणे 'ठकी' ,'तिंबूनाना' , व 'भांबूराव' ही काल्पनिक पात्रे उभी केली.कोल्हटकरांचा प्रभाव गडकऱ्यांवर होताच.त्याचाच परिणाम त्यांच्या लेखनातून जाणवतो. गडकऱ्यांनी सुद्धा 'कवींचा कारखाना', 'स्वयंपाक घरातील गोष्टी ' यातून उपहासपर व कोटीरुप विनोदनिर्मिती केली.

लहानांपासून मोठ्यांपर्यंतचा भंपकपणा('सकाळचा अभ्यास' कथा) त्यांच्या नजरेतून सुटला नाही. विसंगतीचा पुरेपूर उपयोग करून त्यांनी कोट्या व विनोद यांची निर्मिती केली.

मराठी विनोदी कथेच्या परंपरेतील आणखी एक महत्वाचे नाव म्हणजे चिं.वि.जोशी. चिं.वि.जोशी यांनी वयाच्या एकोणिसाव्या वर्षी पहिली विनोदी कथा लिहिली.('एका विद्यार्थ्याची रोजनिशी') त्यांनी विविध प्रकारचे लेखन केले, पण विनोदी लेखक म्हणून ते जास्त प्रसिद्ध पावले. याला कारण त्यांचा विनोद हा तत्कालीन मध्यमवर्गीय जीवनावर आधारित होता. कोल्हटकर, गडकरी यांचे प्रमाणेच त्यांनीसुद्धा 'चिमणराव', 'गुंडया भाऊ' , 'कावेरी' (काऊ), 'चिमणी' (चिऊ), 'मोरू', व 'मैना' अशी काल्पनिक पात्रे निर्माण केली. चिं. वि.जोशी यांनी 'चिमणराव' निर्माण केला तो स्वतःची फजिती सांगणारा,शहाणपणाचा आव आणणारा असा हा ' चिमणराव' हस्यनिर्मितीस कारणीभूत ठरणारा आहे.विवाह पद्धतीतील अनेक बाबींवर चिं. वि.जोशी यांनी विनोदी कथा लिहिल्या आहेत. बदलत्या काळानुसार समाजात झालेले बदल लक्षात घेऊन चिं. वि. जोशी यांनी 'वर' संशोधन ते संसारसुखापर्यंतच्या विविध घडामोडींवर विनोदी पद्धतीने कथालेखन केले आहे. लग्नासाठी कराव्या लागणाऱ्या उपवर मुलींच्या जाहिराती, वर संशोधनासाठी करावी लागणारी पायपीट,वर पक्षाची मर्जी राखतांना वधू पक्षातील मंडळींची दमछाक होणे इत्यादी बाबींवर त्यांनी उपहासाने बोट ठेवले आहे. याशिवाय गुंड्याभाऊंचे नाटकी उपोषण ,'चिमणरावाचा स्पष्टवक्तेपणा' ,'खानावळवाल्या आजीबाई' असे विविध आणि विक्षिप्त माणसांद्वारे समाजातील वैगुण्यावर नेमकेपणाने बोट ठेवले आहे. त्यासाठी त्यांनी कधी निखळ विनोद निर्मिती केली आहे, तर काही ठिकाणी विडंबन.पण स्वतःवरच विनोद निर्मिती करण्याचे धाडस असणारा 'चिमणराव' निर्माण करुन चिं. वि.जोशी यांनी उच्च प्रतीचा विनोद साधला आहे.

चिं.वि.जोशींचे समकालीन आचार्य अत्रे यांनी नाटक,लेख, कविता आशा अनेक अंगांनी उत्तम प्रतिचा विनोद निर्माण केला.साहित्यातील सर्वच क्षेत्रात अग्रेसर असणारे प्र.के.अत्रे यांचा विनोद खळखळून हसवणारा आहे. प्र.के.अत्रे हे रा.ग.गडकरी यांना गुरुस्थानी मानत.अतिशय तीक्ष्ण बुद्धिमत्ता, समयसूचकता, उत्सुकता आणि उस्फुर्तता त्यांच्याकडे होती.अत्र्यांनी राजकारणी लोकांच्या बाबतीत मात्र बोचरा विनोद केलेला दिसतो.

नवकथाकार म्हणून ख्यातकीर्त असलेले गंगाधर गाडगीळ यांनी देखील विनोदी कथेचे क्षेत्र गाजवले.मानवी मनाच्या विविध कंगोऱ्यांवर प्रकाश टाकण्यासाठी गाडगीळांनी 'बंडू' आणि 'स्नेहलता' ही काल्पनिक पात्रे निर्माण केली. तसेच गाडगीळांनी विनोदी कथांमधून निवेदनाच्या विविध पद्धतींचा अवलंब केला. त्यांनी विनोद निर्मितीसाठी तर्हेवाईक पात्रे, कोटी, उपहास यांचा उपयोग केला आहे. सामान्य माणसाची भाषा, जीवनपद्धती कल्पकतेने वर्णून , निखालस विनोद निर्माण केला आहे. तसेच 'फिरक्या' सारखे विनोदी सदर लिहून समाजकारण , राजकारण,साहित्य इत्यादी क्षेत्रातील विसंगती दर्शवली आहे.

त्यानंतर रमेश मंत्री यांनी ' माझा दालचिनचा प्रवास ' हे पत्रकारांवर टीका करणारे अतिशयोक्तीपूर्ण लेखन करून लोकांना हसवले. त्यांचे विनोदासाठीचे विषय वैविध्य उत्सुकता वाढवणारे आहे.उदा. 'गोदावरीची पदयात्रा' (गोदावरी हे म्हशीचे नाव आहे), 'सह्याद्रीची चोरी', 'सचिवालयात हत्ती' ,' युनोत मराठी महिला 'असे कथाविषय घेऊन खुमासदार खिल्ली उडवली आहे.त्यांनी उपहास, विडंबन, अतिशयोक्ती इत्यादीचा उपयोग करून विनोद निर्मिती साधली आहे. त्यांनी 'फँटसी ' चा उपयोग करून विनोदाला नवे परिमाण दिले.

जयवंत दळवी यांनी 'ठणठणपाळ' या टोपण नावाने विनोदी सदर लेखन केले. आपल्या विनोदी कथा त्यांनी ' उपहास कथा ' ,'विक्षिप्त कथा 'अश्या नावांनी प्रसिद्ध केल्या आहेत. प्रस्थापित व्यवस्थेतील विसंगतीवर परखडपणे प्रहार करणे हे जयवंत दळवी यांचे प्रमुख वैशिष्ट्य दिसून येते.

बाळ गाडगीळांनी विनोदकडे वेगळ्या दृष्टीने बघितले आणि मुबलक विनोदी कथा लिहिल्या.बाळ गाडगीळांनी समाजातील समस्या, वेदना, आपमतलबी वृत्ती इ.गोष्टींवर विनोदी ढंगाने ताशेरे ओढले आहेत.

व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील आणि द.मा.मिरासदार यांनी ग्रामीण जीवनावर आधारित विनोदी कथा लिहिल्या आहेत.त्यासाठी त्यांनी ग्रामीण भाषेचा उपयोग केला.शंकर पाटील आणि द.मा.मिरासदार ही जोडगोळी म्हणून ओळखली जाते. विनोदी कथाकथनासाठी ते प्रसिद्ध होते.किंबहुना विनोदी कथाकथनाच्या कार्यक्रमांची सुरुवात करण्याचे श्रेय त्यानांच जाते.

शंकर पाटील यांनी ग्रामीण भागातील समाज वर्तणूकीचे,ग्रामस्थ,सरपंचाच्या कारभाराचे वाभाडे काढण्यासाठी विनोदाचा आधार घेतला. सरकारी पैशाचा अपव्यय करणाऱ्या लोकांवर विनोदाद्वारे ताशेरे ओढले. त्यांचे ' ताजमहालमध्ये सरपंच ' , 'धिंड ' , 'गोम ' यांसारखे विनोदी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

द.मा.मिरसदारांनी ग्रामीण, नागर, राजकीय इत्यादी विषयांवर विनोदी कथा लिहिल्या. मिरसदारांनी प्रामुख्याने ग्रामीण भागातील शाळा, कोर्ट-कचेरी ,सणवार, कुटुंबव्यवस्था , राजकीय नेते सरकारी कर्मचारी, विद्यार्थी, शिक्षक, वकील, अशील, पती-पत्नी आणि इतर रिकामटेकडे लोक इत्यादी बाबींवर लक्ष केंद्रित केले आहे. ग्रामीण लोकांच्या सवयी, लकबी,इत्यादी गोष्टीवर कधी उपहासाने , कधी परिहासाने ,कधी मिश्किलपणे तर कधी अतिशयोक्तीपूर्ण विनोदी कथा लिहिल्या आहेत. मिरासदार माणसांमध्ये रमणारे असल्यामुळे मानवी स्वभावातील विसंगतीचा ते शोध घेतात आणि हलक्या-फुलक्या विनोदाची सहज निर्मिती करतात.

विनोदी कथेची ही परंपरा मराठीत आजही सुरू असलेली दिसते.अलिकडच्या काळात स्त्रियांनी उत्तम विनोदी कथा लिहिलेल्या आढळतात. पद्मजा फाटक, गौरी देशपांडे, इंद्रायणी सावकार, दीपा गोवारीकर, मंगला गोडबोले, विद्यागौरी टिळक इत्यादी नावे उदाहरणादाखल होत.या लेखिकांनी फार सुंदर कथा निर्माण केल्या आहेत.

या सर्व कथाकारांनी मराठी विनोदी कथेचा प्रवाह समृद्ध केला आहे आणि त्याद्वारे मराठी कथेच्या प्रवाहात मोलाची भर घातली आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) भट गो.के., 'विदूषक' ,महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, आ.१ली, मार्च १९५९

२) शेवडे इंदुमती,'मराठी कथा उगम आणि विकास' ,आ १ ली,१९७३

३) संपादक:जाधव रा.ग., ' मराठी वाड्मयाचा इतिहास ', खंड ७वा, भाग ३, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, प्र.आ.१९८१, सु.आ.२००६.

४) पवार गो.मा., ' विनोदी तत्व :स्वरूप' ,मौज प्रकाशन ,आ.२री, मार्च २००८.